Issue No : 7 November 2016

ISSN No. : 2350-1391

NIVRJ

# NEW INTERNATIONAL VALUABLE RESEARCH JOURNAL



Asst. Prof. A. V.

Prathmesh Prakashan,

Scanned with CamScanner

*NEW INTERNATIONAL*
**VALUABLE RESEARCH JOURNAL**

## CONTENTS

*Vol. 1 Issue-7 November 2016*



| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | प्रधानमंत्री जन - धन योजना<br>डॉ. डी.बी. तांदुळजेकर | 1 |
| 2 | भारतातील आंतर - राज्यीय संबंध<br>डॉ. तांदळे डी.आर. | 4 |
| 3 | डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा विविध क्षेत्रातील प्रभाव व कार्य<br>प्रा. रामभाऊ देवराव काशीद | 7 |
| 4 | शिक्षक शिक्षण (बी.एड.) परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या संशोधनांचा आढावा<br>डॉ.कविता साळुंके / सचिन अशोक पोरे | 11 |
| 5 | The Study of the humour and pathos in Charles Dicken's "David Copperfield"<br>Mr.Siddhaarth Ghagare | 19 |
| 6 | "दुर्बळांच्या मानवी हक्कांची पायमल्ली"<br>डॉ. जोगदंड संजय पांडूरंग | 23 |
| 7 | सृजनात्मकता कौशल्य विकास में शिक्षक की भूमिका<br>प्रा.डॉ. कविता साळुंके / कु. ज्योती लष्करी | 26 |





Scanned with CamScanner

**ORIGINAL ARTICLE**

# शिक्षक शिक्षण (बी.एड.) परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या संशोधनांचा आढावा

डॉ.कविता साळुंके
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक

सचिन अशोक पोरे
पीएच.डी. संशोधक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक

## १) सारांश :-

शिक्षक शिक्षण हे प्राचीन काळापासून चालत आलेले आहे.पूर्वीच्या काळी अध्यापन व्यवसायात येणारे शिक्षक हे प्रशिक्षित नव्हते .पुढे शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची गरज जाणवू लागली.व त्यातूनच शिक्षक शिक्षण गतिमान होत गेले. पुढे काळानुसार यात बरेच बदल होत गेले.

शिक्षक शिक्षणाच्या संदर्भात संशोधन करताना पूर्वी झालेल्या संशोधनांचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक आहे.पूर्वीचे संधोधन नेमके काय निष्कर्ष सांगतात.व आज ते निष्कर्ष लागू होतात का? कोणत्या विषयात अजून संशोधन होणे आवश्यक आहे. हे आढावा घेतल्यामुळे समजते. (बी.एड.) च्या परीणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या संशोधनांचा आढावा सदरील संशोधन पेपर मधून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## २) शिक्षक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

पूर्वीच्या काळी अध्यापन व्यवसायात येणारे शिक्षक हे प्रशिक्षित नव्हते.पुढे शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची गरज जाणवू लागली.व त्यातूनच शिक्षक शिक्षण गतिमान होत गेले. पुढे काळानुसार यात बरेच बदल होत गेले.ई.स.पूर्व ५०० ते ६०० पर्यंतच्या कालखंडातील शिक्षक हे कोणतेही प्रशिक्षण घेत नसत.

शिक्षक शिक्षणाचे स्वातंत्र्यपूर्वकालीन काही टप्पे आहेत.ते म्हणजे पहिली अध्यापक शिक्षणाची शाळा 'केरी मार्शमेन वॉर्ड' यांनी सिरामपूर (बंगाल ) येथे सुरु केली.डेमो लोक व मिशनरी यांच्या संयुक्त सहकार्याने शिक्षक शिक्षणाचे कार्य सुरु झाले.पोर्तुगीज मिशनरींनी सेवा करणाऱ्याना प्रशिक्षण देण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केले.ई.स. १७८९ मध्ये डॉ.अद्र्यु वेल यांनी मद्रास येथे एक 'मोनिटोरिअल' पद्धत सुरु केली पुढे. हि पद्धत 'बेल लॅकेस्टर' पद्धत म्हणून ओळखली जाऊ लागली. ई.स. १८१९ च्या सुमारास कलकत्ता स्कूल सोसायटी येथे एतेदेशीय शाळेतील प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले.दि.१३ डिसेंबर १८२३ च्या अहवालात श्री.माऊंटस्टॉट एल्फिस्टन यांनी शिक्षक शिक्षणाबाबत सुधारणा सुचविल्या.त्यात प्राचीन भाषेतील ज्ञानासाठी व्यवस्थापनाचे नियम सुचविले. दि.२५ ऑक्टोंबर १८२४ मध्ये मद्रास स्कूल बुक आणि स्कूल सोसायटी या समितीने शिक्षकांच्या शिक्षणासाठी शाळा सुरु करावी असा प्रस्ताव आपल्या पत्रात मांडला.तसेच श्रीमती विल्सन यांनी कलकत्ता येथे महिलांसाठी प्रशिक्षण विद्यालय सुरु केले.



65

Scanned with CamScanner

ई.स. १८४७ साली मुंबई येथील एल्फिस्टन संस्थेतील अधिव्याख्यातांच्या देखरेखीखाली नॉर्मल स्कूल सुरु झाले.हे शिक्षक शिक्षणाला गती देणारे महत्वाचे पाऊल ठरले. अलेक्झांडर डफ यांनी ई.स १८४९ मध्ये कलकत्ता येथे नॉर्मल स्कूल सुरु केले.१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत शिक्षक शिक्षण शाळा स्थापन करण्यात गती आली.मुंबई,कलकत्ता,मद्रास इलाख्यात नॉर्मल स्कूल स्थापन करण्यात आल्या.

स्वातंत्र्यानंतर शिक्षक शिक्षणात अनेक बदल होत गेले.शिक्षकांसाठी आहे त्या ठिकाणी,फिरत्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या तज्ञ गटांमार्फत उद्बोधन वर्गाची सोय करण्यात आली.सेन्ट्रल अॅडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशनतर्फे शिक्षक-शिक्षण,व शिक्षकांच्या नोकरीच्या अटी याबाबतच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एका समितीची नेमणूक केली. ई.स.१९४० ते १९५० दरम्यान भारतात ४६ नवीन शिक्षक शिक्षण महाविद्यालये स्थापन झाली.त्यात १९४१ मध्ये राजस्थान येथील 'विद्या भवन टीचर्स कॉलेज' पुणे येथील 'द टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन' व आंध्रमधील 'औद्योगिक शाळा' शिक्षकांसाठी प्रशिक्षण शाळा ,यांचा समावेश होता. १९४१ मध्ये मुंबई विद्यापीठाने शिक्षण क्षेत्रात डॉक्टरेट पदवी आणण्यासाठी पुढाकार घेतला. याच सुमारास शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आले.नवनवीन विषयांचा समावेश करण्यात आला.तात्विक भाग व प्रात्यक्षिक भाग यात वाढ करण्यात आली. १९५२-१९५३ मध्ये मुदलियार आयोगाने आपला अहवाल दिला .शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यक्षम शिक्षक आणि कार्यक्षम शिक्षकांसाठी उपयुक्त प्रशिक्षण या त्यांच्या धोरणामुळे शिक्षक शिक्षणातील अभ्यासक्रमातही नवनवीन धोरणे,मूल्यमापनाची तंत्रेविकसित करण्यावर भर दिला.

ई.स.१९६० मध्ये भारतातील प्राथमिक शिक्षकांसाठी आयोजित चर्चासत्रात प्राथमिक शिक्षक शिक्षणावर भर देण्यात आला.प्राथमिक शिक्षक पुढील १० वर्षाचे धोरण राबविण्यास सक्षम असला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.त्यासाठी शिक्षक शिक्षण संस्थामध्ये प्रयोगात्मक कृती कराव्यात ही कल्पना मांडली.याच दरम्यान भारतीय शिक्षण प्रणालीच्या सोयीसाठी ०४ विभागीय महाविद्यालयांची (Regional Colleges) स्थापना करण्यात आली. अजमेर,भोपाळ,भुवनेश्वर,व म्हैसूर,अशा चार ठिकाणी ही विभागीय महाविद्यालये स्थापन झाली. याद्वारे व्यावसायिक व सामान्य शिक्षण कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे हा त्यामागील उद्देश्य होता.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली (NCERT) च्या अंतर्गत NCTE संस्था स्थापन करण्यात आली. ई.स.१९७८ मध्ये राष्ट्रीय शिक्षक-शिक्षण परिषद (NCTE) ने शिक्षक – शिक्षणाची राष्ट्रीय चौकट तयार केली.त्यात शिक्षक-शिक्षण संस्थांना / कार्यक्रमांचा दर्जा खालावणाऱ्या घटकांना आळा घालण्याच्या दृष्टीने तसेच प्रमाणके व मापदंडाचे सातत्याने देखभाल करणाऱ्या विविध कार्यांचा समावेश होता.त्यानंतर १९८८ साली NCTE तर्फे दुसरी चौकट प्रकाशित करण्यात आली. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व १९९२ च्या कृतिकार्यक्रमाच्या धोरणात्मक शिफारशीनुसार NCTE ही एक स्वायत्त संस्था करून त्यांच्यामार्फत शिक्षक शिक्षण संस्थांना मार्गदर्शन करणे आणि अभ्यासक्रम व पद्धती संदर्भात मार्गदर्शन करणे यासाठी NCTE ला आवश्यक संविधानात्मक अधिकार देणे गरजेचे होते.१९९३ मध्ये NCTE चा कायदा संमत करण्यात आला.आणि NCTE ह्या संस्थेस १७ ऑगस्ट १९९५ पासून 'स्वायत्त संस्था' म्हणून स्वतंत्र संविधानात्मक दर्जा प्राप्त झाला. व शिक्षक शिक्षणाची संपूर्ण देशामध्ये एकाच प्रकारे व्यवस्थित मांडणी करण्यात आली. शिक्षक शिक्षणाच्या यंत्रणेमध्ये नियम व अटींचे पालन करण्यात आले.



Scanned with CamScanner

शिक्षक शिक्षणाचे भारतामध्ये संशोधन झालेले आहेत.परंतु त्याची संख्या अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. शिक्षक शिक्षणाच्या भारतामध्ये झालेल्या संशोधनाचे पुढील गटात वर्गीकरण करता येईल ते असे .

- शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम संबंधित झालेले संशोधन.
- शिक्षक शिक्षणाचे मूल्यमापन संबंधित झालेले संशोधन.
- शिक्षक शिक्षण आणि व्यवसाय संबंधित झालेले संशोधन.

## ३) संशोधनाचा आढावा :-

शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम संबंधित झालेले संशोधन:-

३.१ श्रीमती भोसले वत्सला, १९९२ एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई ,पीएच.डी.

'"महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांनी विकसित केलेला शिक्षक शिक्षण नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीचा चिकित्सक अभ्यास".

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

*शिक्षक शिक्षणा संबंधीच्या कोठारी आयोगाने सुचविलेल्या शिफारशींचा अभ्यास करणे.

*महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाच्या निर्मितीचा सखोल अभ्यास करणे.

*नवीन शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीत प्राचार्यांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

संशोधन पद्धती :- या संशोधनासाठीसर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला .

मुख्य निष्कर्ष :-

* महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील शिक्षक *शिक्षण अभ्यासक्रमातील बहुसंख्य विषय सारखीच* आहेत. काही विषयांमध्ये मात्र थोडा फरक आहे.

* महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात घटक शिकविले जाण्याची संख्या भरपूर आहे.

* शिक्षक शिक्षण व प्राध्यापक यांच्या अनुसार पर्यायी विषय व प्रात्यक्षिक कार्य हे खूप भिन्न आहे.

* सर्व विद्यापीठात पर्यायी विषय शिकविले जातात.

३.२ बॅनर्जी जे.सी.१९७४ महाराजा सयाजीराव विद्यापीठ वडोदा पीएच.डी.

'"भारतातील प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण."

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

*गुणवत्ता व संख्यात्मक पैलूंच्या संदर्भात प्राथमिक शिक्षक शिक्षणाच्या गरजांचा शोध घेणे.

*प्रशिक्षण संस्थांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

संशोधन पद्धती :- या संशोधनासाठीसर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला .

मुख्य निष्कर्ष :-

*शिक्षणाचा जुना साचा बदलविण्याच्या कामी शाळा,शिक्षक,आणि प्रशिक्षण संस्था प्रमुख भूमिका वजाऊ शकतात.

* प्रशिक्षण संस्था उच्च प्रकारचे साहस आणि विश्वास निर्माण करू शकतात.

३.३ मलया व्ही. १९६८ पीएच.डी.पदवीसाठी, '"मध्यप्रदेशातील शिक्षकांचे प्रशिक्षण.".

संशोधनाची उद्दिष्ट्ये –



67

Scanned with CamScanner

* शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील आधुनिक विचारप्रवाहांचा शोध घेणे.
*मध्यप्रदेशातील शिक्षक प्रशिक्षणातील समस्यांचा शोध घेउन शिक्षक प्रशिक्षण अधिक परिणामकारक व्हावे म्हणून उपाय सुचविणे.

मुख्य निष्कर्ष :-

* मध्यप्रदेशातील शिक्षक प्रशिक्षणासाठी सुविधा अपुर्या आहेत.
*प्रशिक्षण संस्थामधून पारंपारिक अध्यापन पद्धतीच वापरल्या जातात.तसेच मूल्यमापनाची तंत्रेही पारंपारिकच आहेत. म्हणून या क्षेत्रात संशोधनाची गरज आहे.

३.४यादवरत्नमाला रामराव,२००९यशवंतरावचव्हाणमहाराष्ट्रमुक्तवियापीठ,नाशिक. एम.फिल.,'"मराठवाडा विभागातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिरातील कार्यपद्धतीचा अभ्यास."

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

* शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिरातील कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
* शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिरा अंतर्गत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
* शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिरातील कार्यपद्धतीचा अभ्यास करुन उपाययोजना करणे.
* शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिराचा आराखडा तयार करणे.
* शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अंतरवासिता शिबिराचा आराखडा तयार करुन त्याबाबतची तज्ञाकडून मते आजमावणे .

मुख्य निष्कर्ष :-

* आंतरवासिता शिबिराचे वेळापत्रक एक आठवडा अगोदर तयार केले जाते.
* आंतरवासितेची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शाळेचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असते.
* प्रत्यक्ष आंतरवासितेचा फायदा प्रशिक्षणार्थ्यांना ७५% होतो.
* आंतरवासितेमुळे प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षक –विद्यार्थी या नात्याचा वेगळाच अनुभव येतो.

3.5 राजेश बाबुराव खिल्लारे. २०१० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादपीएच.डी.'"बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात छात्रशिक्षक सेवाकाल राबविताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

*छात्रसेवाकालचे नियोजन करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
* छात्रसेवाकालातील आर्थिक व भौतिक समस्यांचा शोध घेणे.
* छात्रसेवाकाल राबविताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

मुख्य निष्कर्ष :-

* वियापीठ निकषांनुसार बहुतांश शिक्षणशास्त्र महाविद्यालये छात्रसेवाकालाचे आयोजन करून अंमलबजावणीचा काशोसीने प्रयत्न करतात.
* शिकाऊ प्रशिक्षणार्थी असल्यामुळे शाळेच्या उपस्थितीवर ,शिस्तीवर अंशतः परिणाम पडतो.
* बहुतांश छात्रशिक्षक छात्रसेवाकालातील आभिरूप पदे,जबाबदाऱ्या कार्य पार पाडण्याचा प्रयत्न करतात.



68

Scanned with CamScanner

## *शिक्षक शिक्षणाचे मूल्यमापन संबंधित झालेले संशोधन:-

३.६सिन्हा पी. १९८२, पटना विद्यापीठ, पटना पीएच.डी.

'"बिहार राज्यातील शिक्षक प्रशिक्षणाचा मुल्यमापनात्मक अभ्यास."

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

* बिहार राज्यातील शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात जे नवनवीन कार्यक्रम राबविले जातात.त्यांचा मूल्यमापनात्मक अभ्यास करणे.

* वरिल कार्यक्रमाचा परिणाम त्याची गुणवत्ता,त्याचा उपयोग यांचा अभ्यास करणे.

मुख्य निष्कर्ष :-

* प्राथमिक स्तरावर ६० सेवापूर्व प्रशिक्षणार्थी परिपूर्ण प्रशिक्षित होते परन्तु त्यांचे काम समाधानकारक नव्हते.

* बिहार मधील ७७ महाविद्यालयांकडे त्यांची स्वतःची इमारत होती.तर ६५ महाविद्यालयाकडे चांगल्या इमारती नव्हत्या.

* शिक्षक प्रशिक्षणात बऱ्याच ठिकाणी नवीन शैक्षणिक धोरणांचा वापर केला नव्हता.

३.७ उपासनी एन.के. १९६६ पुणे विद्यापीठ, पुणे .पीएच.डी.

'" महाराष्ट्र राज्यातीलग्रामीण विभागाच्या विशेष संदर्भात अस्तित्वात असलेल्या प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांचे मुल्यमापन."

संशोधनाची उद्दिष्ट्ये --

*स्वयमुल्यांकन अहवालाच्या विश्लेषणावरून प्राथमिक शिक्षक शिक्षण कार्यक्रमातील मुख्य सामर्थ्यशाली आणि कमकुवत घटकांची माहिती मिळविणे.

* प्राचार्यांचे अहवाल आणि जिल्हा परिषद शिक्षणाधीकाऱ्याचे वार्षिक तपासणी अहवाल यांची तुलना करून बाह्य तपासणीची उपयुक्तता जाणून घेणे.

* प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणांसंदर्भात प्राचार्य आणि शिक्षणाधिकारी यांच्या मतांचे विश्लेषण व परीक्षण करणे.

मुख्य निष्कर्ष :-

* प्राथमिक शिक्षणा समोर असलेल्या नवीन आव्हानांच्या संदर्भात प्राथमिक शिक्षकांसाठी असणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाचे मूल्यमापन केले,असता असे जाणवते कि, ते समाधानकारक नाही.

* प्रशिक्षणातील प्रात्यक्षिकांमध्ये विविध प्रकारच्या त्रुटी आहेत.प्रशिक्षणार्थ्यांकडून केवळ विशिष्ट संख्येनुसार सरावपाठ पूर्ण करून देणे गरजेचे आहे.

३.८ देवी लक्ष्मी.१९८८ आग्रा विद्यापीठ, आग्रा .पीएच.डी.पदवीसाठी,

'"आग्रा विद्यापीठाच्या 'शिक्षक शिक्षण' या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन."

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

*बी.एड.शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांचा शिक्षक व्यावसायासंबंधीचा सत्रापुर्वीचा दृष्टीकोन मुल्ये , आणि समायोजन क्षमता यांचे मापन करणे.



69

Scanned with CamScanner

* शिक्षक शिक्षणादरम्यान बी.एड.विद्यार्थ्यांचा व्यावसायिक दृष्टीकोन,शिक्षक मुल्ये,व्यक्तिमत्व आणि समायोजन क्षमता यामध्ये झालेल्या बदलांचा शोध घेणे.

मुख्य निष्कर्ष :-

* बि.एड.सत्र सुरु होण्यापूर्वी कमी आणि फरक असणारे सहसंबंध घटक निवड आणि शिक्षक दृष्टीकोन यांमध्ये फरक आहे.
* शिक्षक दृष्टीकोन आणि समायोजन,शिक्षक समायोजन आणि शिक्षक मुल्ये यांमध्ये कमी व लक्षणीय फरक नव्हता.
*शिक्षक शिक्षण एकूण प्रवाहातील मुल्ये सकारात्मक होती.पण सार्थ लक्षणीय नव्हती.

## • शिक्षक शिक्षण आणि व्यवसाय संबंधित झालेले संशोधन:-

३.९ शर्मा आर.१९७०, विक्रम विद्यापीठ पीएच.डी. मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील पदवीपूर्व प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायीक गरजांचा शोध";

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

* प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणाची उद्दिष्ट्ये निश्चित करणे.
*शिक्षक प्रशिक्षकांच्या शैक्षणिक,व्यावसायिक,व आर्थिक स्थितीची पाहणी करणे.
*सेवाभरती व सेवाशार्तींचा अभ्यास करणे.

मुख्य निष्कर्ष :-* मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील शिक्षक प्रशिक्षकांच्या वेतनात फारसा फरक आढळून आला नाही.दोन्हीही राज्यात शासकीय संस्थांमध्ये हायस्कूलमधून शिक्षक म्हणून कार्य करणारे शिक्षक-प्रशिक्षक नेमण्यात आल्याचे आढळून आले.

*प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधील शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक गरजा पुढीलप्रमाणे दिसून आल्या.

अ) सुसज्ज ग्रंथालय संशोधनाशी संबंधित अद्ययावत साहित्य उपलब्ध असावे.
ब) व्यावसायिक संघटनांच्या बैठकींना उपस्थित राहण्याच्या सोयी असाव्यात.

३.१०सिन्हा व. यांनी १९८०मध्ये बनारस हिंदू विद्यापीठ वाराणशी पीएच.डी.
'"शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा शिक्षकांच्या व्यावसायिक कार्यक्षमतेवर होणारा परिणाम".

संशोधनाची उद्दिष्ट्ये –

*वर्गातील अध्यापनाच्या परिणामाचा अभ्यास करणे.
*शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षक यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन याबाबत अभ्यास करणे.

मुख्य निष्कर्ष :-* व्यावसायीक कार्यक्षमतेच्या दृष्टीकोनातून प्रशिक्षणात शिक्षक हे अप्रशिक्षित शिक्षकांपेक्षा विषयज्ञान,तयारी,आत्मविश्वास आवाज,उच्चारण,चेहऱ्यावरील अविर्भाव इत्यादी बाबत सरस होते.



Scanned with CamScanner

* प्रशिक्षित शिक्षक हे अप्रशिक्षित शिक्षकांपेक्षा एखादा पाठ कसा मांडावा शैक्षणिक साधनांचा उपयोग कसा भरून घ्यावा,विद्यार्थ्यांना कोणते व कसे प्रश्न विचारावे,फलकाचा वापर कसा करावा,विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढवावा.ई.बाबत सरस ठरतात.

* प्रशिक्षित शिक्षक व अप्रशिक्षित शिक्षक यांच्यामध्ये वर्ग नियंत्रणाच्या बाबतीत फारसा फरक आढळला नाही.

उपरोक्त सर्व संशोधन अभ्यासावरून असे लक्षात येते कि शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम संबंधित झालेले संशोधनाचे प्रमाण चांगले आहे.तर व्यवसाय संबंधित झालेले संशोधन हे दुर्लक्षित आहे. यासंबंधित शिक्षक शिक्षण संदर्भात काही महत्वपूर्ण निष्कर्ष आले ते पुढील प्रमाणे आहेत.

१. शिक्षणाचा जुना साचा बदलविण्याच्या कामी शाळा,शिक्षक,आणि प्रशिक्षण संस्था प्रमुख भूमिका बजाऊ शकतात.
२. प्रशिक्षण संस्था उच्च प्रकारचे साहस आणि विश्वास निर्माण करू शकतात.
३. आंतरवासितेमुळे प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षक –विद्यार्थी या नात्याचा वेगळाच अनुभव येतो.
४. प्राथमिक शिक्षणा समोर असलेल्या नवीन आव्हानांच्या संदर्भात प्राथमिक शिक्षकांसाठी असणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाचे मूल्यमापन केले असता असे जाणवते कि, ते समाधानकारक नाही.

## समारोप :-

शिक्षक शिक्षण (बी.एड.) परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या संशोधनांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की भारतामध्ये शिक्षक शिक्षण (बी.एड.) परिणामकारकतेच्या संबंधित संशोधन झालेले आहेत.पण त्यांचे प्रमाण कमी आहे. पूर्वी झालेल्या संशोधनांचे तीन प्रकारे वर्गीकरण केले.शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम संबंधित झालेले संशोधन, शिक्षक शिक्षणाचे मूल्यमापन संबंधित झालेले संशोधन, शिक्षक शिक्षण आणि व्यवसाय संबंधित झालेले संशोधन. वरील संशोधने ही त्या त्या काळाप्रमाणे झालेली आहेत. आजचे संशोधनाचे विषय व समस्या विभिन्न आहेत. मुक्त विद्यापीठ व पारंपारिक विद्यापीठ यांच्या शिक्षक शिक्षण शिक्षणक्रमाचा परिणामकारक अभ्यास याबाबत ही संशोधन झालेले नाही.त्याचे हि संशोधन होणे गरजेचे आहे. या संशोधन पेपरच्या माध्यमातून भारतातील शिक्षक शिक्षण (बी.एड.) परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या संशोधनांचा अभ्यास करून शिक्षक शिक्षण संशोधनास मदत होणार आहे.

संदर्भग्रंथ सूची :-

२.आगलावे पी., (2000): 'संशोधन पद्धती व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर.
३ भिंताडे वी.रा., (2006): 'शैक्षणिक संशोधन पद्धती,' नित्य नूतन प्रकाशन, पुणे
५.पंडित ब.वि., (2010), 'शिक्षणातील संशोधन', नित्य नूतन प्रकाशन, पुणे
६.बोरुडे रा.र. (2008), : 'संशोधन पद्धतीशास्त्र', पुणे विद्यार्थिगृह प्रकाशन, पुणे



71

Scanned with CamScanner